# जनसंपर्क अधिकारी

**पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय**
**रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक ७६-२२** **दिनांक - ०७/०३/२०२२**

## तुळींज पोलीस ठाणे हद्दीत झालेल्या फायरिंगच्या गुन्ह्यातील आरोपीस २४ तासाचे आत २ गावठी बनावटीच्या पिस्तुल, १४ जिवंत काडतुस व २ खाली केससह पकडण्यात गुन्हे शाखा कक्ष २ यांना यश

दिनांक ०६/०३/२०२२ रोजी २१:३० वा.चे सुमारास फिर्यादी श्री. हितेंद्र नरेंद्र जोशी, वय २९ वर्ष, रा. अशोक सिंग चाळ, शर्मावाडी, संतोषभवन, नालासोपारा पुर्व, ता. वसई जि. पालघर हे त्यांचे घरासमोरील गल्लीमध्ये सिगारेट पित असताना त्यांचा मेव्हणा नामे दिपक लालताप्रसाद गौतम याने त्याची बहीण चंदा हिचेसोबत फिर्यादीने प्रेमविवाह केल्याने त्यांना जिवे ठार मारण्याच्या उद्देशाने त्यांचे पाठीमागुन पिस्तुलाने फायरींग करुन फिर्यादीस जखमी केलेबाबत तुळींज पोलीस स्टेशन येथे गु.र.क्र. १५०/२०२२ भादविसं कलम ३०७,३२६ सह भारतीय हत्यार कायदा कलम ३,२५,४(२४) प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

वरील गुन्हयाची माहिती मिळताच गुन्हे शाखा, कक्ष २, वसई पथकाने गुन्हयाचे गांभीर्य लक्षात घेवून गुन्हयाचा समांतर तपास सुरु केला. तात्काळ गुन्ह्याचे घटनास्थळी भेट दिली. गुप्त बातमीदारामार्फत गुन्ह्यातील आरोपी दिपक लालताप्रसाद गौतम याची वैयक्तिक तसेच त्याचे ठावठिकाणे, नातेवाईक व मित्र यांच्याविषयी माहिती प्राप्त केली. त्यानुसार नमुद आरोपीचा खार पुर्व व पश्चिम परीसरात शोध घेतला असता आरोपीत नामे दिपक लालताप्रसाद गौतम, वय ३० वर्ष, रा. शर्मावाडी, नालासोपारा पुर्व हा खार पुर्व गोळीबार रोड येथे २ गावठी बनावटीच्या पिस्तुल, १४ जिवंत काडतुस व २ खाली केससह मिळुन आला. त्यास ताब्यात घेऊन पुढील कारवाईसाठी तुळींज पोलीस ठाणे येथे हजर करण्यात आले आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास तुळींज पोलीस ठाण्याचे वपोनि/राजेंद्र कांबळे हे करीत आहेत.

सदरची कामगिरी ही डॉ. श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. अमोल मांडवे, सहायक पोलीस आयुक्त (गुन्हे) यांच्या मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष २, वसई चे श्री. शाहूराज रणवरे, पोलीस निरीक्षक, श्री. रणजितसिंग परदेशी, सहायक पोलीस निरीक्षक, श्री. सुहास कांबळे, सहायक पोलीस निरीक्षक, श्री. ज्ञानेश्वर जगताप, सहायक पोलीस निरीक्षक, पोहवा/ मंगेश चव्हाण, पोहवा./ संजय नवले, पोहवा./रमेश भोसले, पोहवा/सचिन पाटील, पोहवा/महेश पागधरे, पोहवा/चंदन मोरे, पोना/ प्रशांत ठाकूर, पोना/ जगदीश गोवारी, पोना/ रमेश अलदर, पोना/ प्रशांत पाटील, पोशि/ अमोल कोरे, पोशि/ सुधीर नरळे, पोशि/ दादा आडके तसेच तुळींज पोलीस ठाणेचे श्री. मिथुन म्हात्रे, सहायक पोलीस निरीक्षक व स्टाफ यांनी केलेली आहे.

-------------oo----------------